॥श्री॥

"प्रसंगा प्रसंगात जाणवलेला ईश्वराचा हात."

" पाताल भूतलव्योम चारिणश्छद्मचारिणः ।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः ॥११॥

अर्थ :- पाताललोक, स्वर्गलोक आणि भूलोकात ज्या काही दुष्ट शक्ती किंवा जीवजंतू असतील त्यापासून रामनाम रक्षण करते.

श्रीरामरक्षेतील ह्या ११ व्या श्लोकातील आश्वासन मला खूपच आश्वस्त करत आले आहे. ह्या आश्वासनामुळे कुठल्याही कठीण प्रसंगात खूप धीर मिळतो, आणि मी मोठ्या धीराने अनेक संकटांवर मात करत उभी राहिले आहे. श्रद्धा आणि प्रार्थना ह्यात खूप ताकद असते ह्याचीही प्रचिती मला वारंवार आली आहे. ईश्वर कोणत्या रूपात *मदतीचा* हात देईल ह्याची दृष्टी मात्र नक्कीच विकसित करायला हवी.

2020 सालाची सुरवातच चीनमधल्या जीवाणूने घातलेल्या थैमानाच्या बातम्या देऊन झाली. पण पुढे हे संपूर्ण जग व्यापून वैश्विक महामारीचे बीज आहे ह्याची जाणीव हळूहळू जगभरात होऊ लागली आणि सर्वत्र भितीचे सावट पसरले. संकटावर मात कशी करायची? त्यावर उपाय कोणते? झपाट्याने बाधित करणाऱ्या ह्या साथीचे रुग्णसेवा कशी पुरवायची? त्याचे प्रमाण काय? इ. अनेक प्रश्न आणि सुविधांची युद्धपातळीवर सर्वच देश तयारी करू लागले. भारतात ह्याचे गांभिर्य फेब्रु-मार्चच्या सुरवातीस जाणवू लागले. सर्वत्र टाळेबंदी, संचारबंदी, संपर्क टाळणे अशी उपाययोजना सर्वच देशांनी सुरु केली. कार्यालये, दुकाने, वाहतूक सेवा, सर्व बंद केले. त्याला मी तरी कशी अपवाद असणार? १६ मार्च 2020 हा माझा कार्यालयातील शेवटचा दिवस ठरला. 'अजून ऑफीसला जातेस?" अशा प्रेमळ दटावणीमुळे मी १५ तारखेलाच ७ दिवसांच्या रजेचा अर्ज दिला होता. सर्व सहकाऱ्यांना सूचना देऊन आवरा आवरी करुन, पुढच्या आठवड्यात नक्की भेटू या. "काळजी घ्या सर्वांनी" असा निरोप घेऊनच घरी परतले.

आज ह्या गोष्टीचे सूचन हसू येत आहे तेव्हा काम करताना की हे साथ १-२ नाहीतर जवळ जवळ १०-११ महिने आपल्याला घरी बसवणार आहे? असो

तर १६ मार्च २०२० पासून सक्तीची रजा सुरू झाली. whats up आणि त्यावरील संदेशांचा सुकाळ सुरु होता आणि विरंगुळ्याचे ते एक मोठेच साधन बनले होते. नव नवीन पदार्थ बनवणे, घरी आरामात उठणे, एकत्र चहा व गप्पा ह्या सगळ्यांची गोडी वाटून घरी राहणे सुखाचे वाटू लागले. परंतु जसजशी टाळेबंदीची मुदत आणि COVID-19 ह्या महामारीचा प्रभाव, प्रसार आणि तीव्रता वाढू लागली तसतशी अनेक गोष्टींच्या उपलब्धतेची उणीव जाणवू लागली. स्वच्छतेच्या साधनांचा वापर हा योग्य होतो आहे ना अशा शंका-कुशंकांनी मन अस्वस्थ झाले. वाणसामान, भाजीपाला दूध, फळे एक ना अनेक गोष्टी, ह्यातून करोनाचे जीवाणू तर घरात येत नाहीत ना? हात sanitize झाले आहेत ना? एक ना अनेक शंका. मला ३०-३५ वर्षे नोकरी आणि घर सांभाळून व्यस्त राहण्याची सवय झालेली. सगळीच दिनचर्या बदलली. हळूहळू खूप मोठी पोकळी जाणवू लागली होती. ही पोकळी भरून काढणे आणि मनोधैर्य वाढविणे गरजेचे आहे हे जाणवू लागले आणि ते खूप आवश्यकही होते. मग कपाटात मागे पडलेले रेशीम धागे काढले थोडे भरतकाम करून मास्क शिवले आणि सुप्त कलागुणांना वाट करून दिली. घरातूनच समाजकार्य करण्याची संधी मिळाली. उदा. औषधांचे वाटप, शेतकऱ्यांशी संपर्क साधून परिसरात भाजी व फळे ह्यांची सोय करणे इ. आता मन एकाग्र आणि शांत करण्यासाठी अध्यात्मिक गोष्टीत वेळ देऊन, वेळेचा सदुपयोग करायचे ठरवले. लहानपणापासून घरात अध्यात्मिक वातावरण होतेच पण त्यासाठी खूप वेळ मिळत नव्हता. ह्या "नजरकैदेचा" फायदा करून अध्यात्मिक साधनेत वेळ घालविण्याची आयतीच संधी मला मिळाली. जप, स्तोत्रपठण, वाचन, zoom meetings, ध्यान प्रकार व योगासने ह्यावर जोर दिला. खरे समाधान ईश्वर प्रार्थनेतूनच मिळू लागले.

ईश्वराबद्दलची श्रद्धा वाढूच लागली आणि प्रचितीही येऊ लागली. प्रार्थनेत खूप ताकद असते ह्याची सत्यता पटली.

भगवंतान प्रथम ताण-तणावातून मुक्ती मिळायला सुरवात झाली आणि अनावश्यक धावपळीमुळे होणारी ओढाताण थांबली. मन शांत आणि स्थिर होऊ लागले त्याचा सुयोग्य परिणाम माझ्या मधुमेहाच्या report मधून दिसून आला. साखरेचा आलेख "नॉर्मल" वर आला. ईश्वराचे आभार मनापासून मानले. आपत्ती हे इष्टापत्ती ठरते ह्याचा अनुभव आला आणि श्रद्धा अजूनच वाढली. भगवद्गीतेचा अभ्यास व प्रवचने ऐकायला सुरवात केल्यावर तर सर्व समस्यांवरचे आणि सुखी जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या नियमांची गुरुकिल्लीच सापडली.

"सुखदुःखे समेकृत्वा लाभालाभौ जयाजयौ" ह्या गीतेतल्या श्लोकानुसार विचारमंथन सुरु झाले. अशी ही आध्यात्मिक प्रगतीची सुरवात झाली. अशातच ईश्वराने जणू माझी परिक्षाच घ्यायची असे ठरवले असावे, अशी एक घटना घडली. माझ्यात करोनाची लक्षणे दिसू लागली. भरपूर सर्दी व खोकला सुरु झाला आणि तापही आला. घरात सगळ्यांचेच धाबे दणाणले. डॉक्टरांनी प्राथमिक औषधे द्यायला सुरवात केली. करोनाचा प्रादुर्भाव इतका भरात होता की सर्व हॉस्पिटल्स व विलगीकरण केंद्रे भरली होती. कुठेही भरती होण्यासारखी स्थिती नव्हती.

ताप वाढत नव्हता पण खोकला काही केल्या थांबत नव्हता
लगेचच श्वास घेईनासा झाला लगेचच डॉक्टरांना फोन,
हॉस्पीटलची शोधाशोध सुरु केली सगळी बेडही भरुन
होते COVID च्या चाचणीसाठी सोय केली. मीही
खुप घाबरले होते आणि थकलेही होते. परंतु माझे मन
मला सांगत होते, घाबरु नकोस, धीर धर। रामनामाचा
जप आणि "पातालभूतलव्योम.... " हा श्लोक सतत
म्हणत राहिले आणि सतत सर्वांना सांगत राहिले, "COVID-19
चाचणीचा report काहीही येवो पण मी हॉस्पिटल मध्ये
जाणार नाही. मला घरातच विलगीकरणात राहू द्या.
मी सर्व काळजी घेईन. नक्कीच काहीतरी चमत्कार घडेलच!
आणि मला नक्कीच ईश्वरीय मदतीचा हात मिळेल."
रिपोर्ट येईपर्यंतचे ते दोन दिवस अतिशय तणाव, चिंता
ह्यांनी ग्रासलेले होते आणि अखेर तो दिवस उजाडला
Report आले आणि काय आश्चर्य.... 'Report Nigative"
COVID नाही. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना!!
घरात एकच जल्लोश! मी कृतज्ञतेने आणि अत्यंत
आनंदाने देवासमोर उभी राहिले. डोळ्यातून आनंदाश्रू
वाहत होते. माझा विश्वास खरा ठरला होता. आणि
ईश्वराने मदतीचा हात दिला होता. "Report - Covid -
Nigative" हे एक आश्चर्यच होते. डॉक्टरांचा होरा
चुकवत आणि सगळी लक्षणे असूनही मला, माझ्या
श्रद्धेला त्या परमात्म्याने वाचवले होते. "गंभीर आजारापासुन".

अर्धांगाच्या पुढील ५-६ दिवसात मी पुर्णपणे बरी झाले. अशा अनेक प्रसंगात मला ईश्वराच्या उंच मदतीला आलेला मला जाणवले आहे. हि मे २०२० मधील घटना।

सप्टेंबर २०२० मध्ये दाराच्या अंगणात फुले काढायला गेले होते. मन प्रसन्न होते पावसाची नुकतीच सर येऊन गेली होती. पण त्याच नादात माझा पाय घसरून मी पडले आणि माझा डावा हात फ्रॅक्चर झाला. वेदनेने विव्हळत मला हॉस्पिटलात नेले. तिथल्या परिचारिकांनी मला ऑपरेशन करावे लागेल असे सांगुन, ECG, Sugar, B.P अशा चाचण्या सुरु केल्या. मी आधीच्या आजारपणातुन नुकतीच सावरत होते. माझ्यात सर्जरी करुन घेण्याइतपत अजिबात ताकद नव्हती. त्यात मला एकटीला रहावे लागेल. करोनाच्या काळात तुम्हाला सोबतीला कोणी येणार नाही, अशा अनेक नियमांचे खूपच दडपण आले. माझा नेहमीप्रमाणेच जप सुरु झाला. आणि कमाल झाली. अस्थितज्ञ डॉक्टर त्यांची वेळ नसताना देखील आले त्यांनी मला खूप धीर दिला. माझा X-Ray काढायला लावला, अर्धातासच झाला असेल! आणि मला समजावले की ८ दिवस आपण हात गळ्यात अडकवुन ठेवू आणि नंतरच ठरवू काय करायचे ते। बहुधा ऑपरेशन करावे लागणार नाही। मी परत कृतज्ञ आणि भारावुन ईश्वराला मनोमन नमन केले हात जोडता येत नव्हते ना। मला इतका दिलासा मिळाला उत्तम, प्रतिथयश डॉक्टर ईश्वर रुपात मदतीचा हात देऊन आले कि! खरच पुढे मला ऑपरेशन न करता बरे वाटले। म्हणजेच हात बरा झाला. असे अनेक प्रसंग आले जीवनात-ज्यात मला ईश्वराच्या मदतीचा हात जाणवला आहे.

परंतु ह्या कठिण काळात जाणवलेला हा ईश्वरीय मदतीचा हात कृतज्ञतेची आणि कृपेची मी कशी उतराई होऊ! ह्या तणावग्रस्त वातावरणात मदतीला आलेले ईश्वरीय रुपातले देवदुत आणि त्यांची मदत मला अंतर्मुख करून गेली. डॉक्टर, उपचारिका, सफाई कामगार

पोलीस, स्वयंसेवक, सामाजिक संस्था ह्या सर्वांची मदत कित्येक रुग्णांना, नागरीकांना मदतीचा हात देऊन गेली आणि ती देखील जागतिक पातळीवर!! त्यांचा सत्कार हे आपले कर्तव्यच आहे. ईश्वर सर्वांनाच मदत करत असतो पण तो कोणत्या रुपात देवदुत पाठवेल ह्याची दृष्टी आणि जाणीव मात्र झाली पाहिजे, हे निश्चितच! निसर्गाने ह्या काळात आपली कमालही दाखवली की! ईश्वराची मदत सर्व पशु-पक्ष्यांनाही आलीच की! आपण पाहिले की, पशु मोकळेपणाने फिरले, पक्षी बागडले आणि कठिण काळात सुखाची जरी किनार दाखवली कि त्या परमेश्वराने! त्याची उतराई होताना आणि कृतज्ञता पुढील काव्यपंक्तींतून स्फुरल्या....
जणू फिनिक्स पक्षाने राखेतुन भरारी घेतल्याप्रमाणे....

* सुप्रभाती स्फुरण हे कवनाचे, उतराईचे
गुंफुनी डायरीत शब्द मौक्तिक हे जुळविले ॥
* गृहबंदीने स्वावलंबन हे घरी जाहले
परि बाह्य जगती परावलंबित्व ते आले ॥
* भेटी-गाठी, लग्न-सोहळे, तंत्रज्ञानाद्वारे जाहले
दुधावरची तहान ताकावर ती भागली ॥
* वाईटातुनही घडे चांगले आशा ही जागवली,
बघता बघता निसर्ग तो फुलला अन् खग ते किलबिलले ॥
* जलचर, वन्यजीव ते सुखे बागडले,
सृजनाचा तो रम्य सोहळा, तन-मन मोहरले ॥
* वाट बिकट पुढची, काळजी अन् संशयाची
परि असेल साथ नव संकल्प, नव कल्पनांची ॥
* दक्षतेची नवी सूत्रे पुनर्जिवीत करती सनातनी संस्कार,
धीर धर तू नको घाबरु उभा पाठीशी तो परमेश्वर ॥
* मात कराया तमावर सज्ज मानव पुन्हा एकदा
ईश्वरी अन् मानवी मदतीसह सदा सर्वदा ॥

॥ श्री कृष्णार्पण अस्तु ॥

— x o x —